| MHNS160000232020 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | ०४/०१/२०२० | | |
| | नोंदणी दिनांक | :- | ०४/०१/२०२० | | |
| | न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०३/२०२६ | | |
| | **कालावधी** | **:-** | **वर्ष,** | **महिने,** | **दिवस** |
| | | | **०६** | **०२** | **०६** |

**चांदवड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,न्यायालय क्रं. ०१ यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी- एस. एस. छल्लाणी)**

(घोषीत दिनांक १०/०३/२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१४/२०२०**

**निशाणी क्र.३८**

**गु.र.नं. १७/२०१९**

**पोलीस ठाणे चांदवड.**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन मार्फत,**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पो.स्टे. चांदवड, जि. नाशिक. |
| **अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता** | श्री. एन. पी. मोरे |
| **आरोपीचे नावे** | **दिपक अरुण शेवाळे,**<br>वय:- २२ वर्ष, व्यवसाय :- शेती,<br>रा. सांगवी फाटा उमराणा, ता. देवळा,<br>जि. नाशिक, |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | श्री. व्ही. एस. पाटील वकील, |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ३०/०१/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०५/०२/२०१९ |

**CNR No.MHNS160000232020** **सं.फौ.ख.क्र.१४/२०२० (न्यायनिर्णय)**
**सरकार विरुद्ध दिपक शेवाळे.**

| | |
|---|---|
| दोषारोपत्र दाखल दिनांक | ०४/०१/२०२० |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०४/०१/२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०३/२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशील**

| | |
|---|---|
| आरोपीची श्रेणी | १ |
| आरोपीचे नाव | **दिपक अरुण शेवाळे** |
| अटक तारीख | ११/०२/२०१९ |
| जामीनवर सोडल्याची तारीख | ११/०२/२०१९ |
| अधिनियम | भा.द.वि. १८६० चे कलम २७९, ३०४–अ, व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ अन्वये |
| निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | निर्दोष मुक्त |
| दिलेली शिक्षा. | निरंक |
| सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी. सी. | निरंक |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | राजाराम भाउराव जोंधळे | फिर्यादी (निशाणी क्र.१५) |
| अ.सा.क्र.२ | शिशिर सुरेश यशवंते | पंच साक्षीदार (निशाणी क्र. २२) |
| अ.सा.क्र.३ | ज्ञानेश्वर संतु शिंदे | साक्षीदार (निशाणी क्र. २६) |
| अ.सा.क्र.४ | बापू हिरामण चव्हाण | तपासी अधिकारी (निशाणी क्र. २९) |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रं.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

CNR No.MHNS160000232020 — सं.फौ.ख.क्र.१४/२०२० (न्यायनिणर्य)
सरकार विरुद्ध दिपक शेवाळे.

## क. कोर्ट निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | दोषारोप | निशाणी क्र.०८ |
| २ | ३१३(१)(ब) | निशाणी क्र. ३७ |
| ३ | फिर्यादवरीलस सहीस | निशाणी क्र. १६ |
| ४ | घटनास्थळ पंचनामा | निशाणी क्र. २३ |
| ५ | मो.वाहन कायदा नोटीस | निशाणी क्र. ३० |
| ६ | उप प्रादेशिक परिवाहन अधिकाऱ्यांना तांत्रिक तपासणीकरीता दिलेले पत्र | निशाणी क्र. ३१ |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | – | निरंक |

## न्यायनिर्णय
**(घोषित दिनांक : १०/०३/२०२६ )**

**०१.** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३०४–अ,३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

## अभियोगपक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

**०२.** अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक ३०/०१/२०१९ रोजी सायंकाळी ६:०० वाजताच्या सुमारास मुंबई–आग्रा महामार्ग नाशिक ते चांदवड जाणाऱ्या रोडवर आडगाव टप्पा, ता. चांदवड येथे

आरोपी याने त्याच्या ताब्यातील मारुती सुझूकी कंपनीची लाल रंगाची ब्रिझा गाडी क्र. एम. एच. ४१, ए. एस. ४१४२ ही नाशिकबाजूकडून चांदवड बाजूकडे चालवून घेवून जात असतांना ती त्याने हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवून त्याच्या समोरुन रोड क्रॉस करणारा इसम भाऊराव आनंदा जाधव यास ठोस मारुन अपघात करुन अपघाताची खबर न देता पळून गेला व सदर रोड क्रॉस करणारा इसम हा उपचारादरम्यान धुळे येथे भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात औषधोपचार घेत असतांना दि.३१.०१.२०१९ रोजी मयत झाला, व त्याच्या मरणास कारणीभूत झाला म्हणून फिर्यादीने चांदवड पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली.

**०३.** आरोपीविरुध्द अपराध क्र.१७/२०१९ जो भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ नुसार नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. बी. एच. चव्हाण पो. ह. यांनी दाखल गुन्हयाचा तपास केला. तपासा दरम्यान त्यांनी फिर्यादीचे व साक्षीदारांचे बयाण नोंदविले व दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४-अ, व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप **नि.क्र.०८** प्रमाणे निश्चित केला. आरोपीने त्याचेविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप नाकारुन सुनावणीची मागणी केली, म्हणुन संपरीक्षा पुढे चालविण्यात आली. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये अभिप्रेत असलेला आरोपीचा जबाब **निशाणी क्र. ३७** वर नोंदविण्यात आला आहे.

०५. माझ्या विचारार्थ निघालेले विचाराधीन प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे :-

| अनु.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, दिनांक ३०/०१/२०१९ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास नाशिक-चांदवड रोड, आडगाव टप्पा, ता. चांदवड येथे आरोपी याने त्याच्या ताब्यातील ब्रिजा गाडी क्र. एम.एच.४१, ए.एस. ४१४२ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने मयत भाऊराव आनंदा जाधव यांना जोऱ्यात धडक दिली ? | **...नाही.** |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून भाऊराव आनंदा जाधव यांचा मृत्यू घडवून आणला की ज्यामुळे मानवी जीवन धोक्यात येईल आणि ते दोषपूर्ण मनुष्यवध नाही ? | **...नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे भरधाव वेगात चालवून अपघात घडवून आणून तेथून पळून गेला ? | **...नाही.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील दिनांक, वेळ व ठिकाणी येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर इतक्या निष्काळजीपणे चालवले की, मानवी जीव धोक्यात येईल, जखमींना जवळच्या वैद्यकीय दवाखान्यात न पोहोचवता तेथून पळून गेला ? | **...नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **अंतीम आदेशानुसार.** |

## कारणमिमांसा

०६. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले ते म्हणजे फिर्यादी राजाराम भाऊराव जोंधळे (अ.सा.क्र.१) यांना **निशाणी क्र.१५,** शिशिर सुरेश यशवंते (अ.सा.क्र.२) यांना **निशाणी क्र. २२**, ज्ञानेश्वर संतु शिंदे (अ.सा.क्र.३) यांना **निशाणी क्र. २६,** बापू हिरामण चव्हाण, (अ.सा.क्र.४) यांना **निशाणी क्र. २९,** वर तपासले आहे. अभियोग पक्षाचा साक्षीपुरावा **नि.क्र.०१** वरील आदेशावरुन बंद करण्यात आला.

**विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ४ बाबत:-**

०७. विचाराधारीन प्रश्न क्र.१ ते ४ हे संलग्नीत असल्याने ते चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले.

०८. अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार राजाराम भाऊराव जोंधळे याला **निशाणी क्र.१५** वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, मयत भाऊराव आनंदा जाधव त्याचे दाजी होती. दि.३१.०१.२०१९ रोजी सायंकाळी ७:०० वाजता आडगाव टप्पा येथे भाऊराव जाधव यांचा अपघात होवून ते मयत झाले. त्यावेळी ते पायी सेलू येथे जात असतांना नाशिकवरुन येणाऱ्या एका चारचाकी ब्रिजा गाडी क्र. एम.एच.४१, ए.एस. ४१४२ या गाडीने त्यांना धडक दिल्यामुळे त्यांच्या डोक्याला व पायाला मार लागला. घटनेच्यावेळी फिर्यादी त्याच्या गावी पाथरशेंबे येथे होता. त्यावेळी फिर्यादीला पोलीस स्टेशनमधून फोन आला व त्यांनी फिर्यादीला अपघाताबाबत माहिती दिली. अपघातानंतर मयत भाऊराव यांना उपजिल्हा रुग्णालय, चांदवड येथे आणण्यात आले. त्यानंतर त्यांना मालेगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले व त्यानंतर त्यांना धुळे येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी ते मयत झाले. त्यानंतर

फिर्यादी घटनेची फिर्याद पोलीस स्टेशनला दिली.

**०९.** त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले आहे की, फिर्याद किती तारखेला दिली हे त्यांना सांगता येणार नाही. मुंबई–आग्रा महामार्ग हा रहदारीचा आहे, मुंबई–आग्रा महामार्गावरील आडगाव टप्पा या ठिकाणी आडगावकडे जाण्याकरीता रस्ता देण्यात आला आहे, आडगाव टप्पा या स्थळी गतिरोधक देखील आहेत, आडगाव टप्पा या ठिकाणी गतिरोधक असल्यामुळे त्या ठिकाणी वाहनांचा वेग कमी होतो, सरतपासात नमुद केलेला अपघात त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेला नाही. फिर्याद पोलिसांनी संगणकावर तयार करुन ठेवली व त्याने त्यावर सही केली असे कथन केले आहे.

**१०.** अभियोग पक्षाने पंच साक्षीदार शिशिर सुरेश यशवंते(अ.सा.क्र.२) याला **निशाणी क्र.२२** वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दि.०६.०२.२०१९ रोजी तो आडगाव टप्पा येथे घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता गेला होता. त्याला पोलिसांनी अपघातासंदर्भात पंचनामा करण्याकरीता बोलावले होते. त्यावेळी दुसरा पंच हा दिलीप कारभारी बोरघुडे हा होता. घटनास्थळावरील रस्त्यावर रक्ताचे डाग पडले होते व काचांचे तुकडे पडलेले होते. घटनास्थळाच्या पूर्वेला मुंबई–आग्रा महामार्ग, दक्षिणेला मालेगाव–नाशिक रस्ता, त्याच्या पलिकडे महाराणा हॉटेल आणि चिंचोले गावाकडे जाणारा कच्चा रस्ता व उत्तरेकडे आडगावकडे जाणारा रस्ता आहे.

**११.** त्याने त्याच्या उलटतपासात कथन केले आहे की, फिर्यादीला तो ओळखतो, फिर्यादी सदर साक्षीदाराच्या शेजारी राहत होते. पंचनाम्यासाठी पोलिसांनी त्याला नोटीस दिली नव्हती.

१२. अभियोग पक्षाने साक्षीदार ज्ञानेश्वर संतु शिंदे (अ.सा.क्र.३) याला **निशाणी क्र.२६** वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दि.३०.०१.२०१९ रोजी संध्याकाळी ७:०० वाजताच्या सुमारास ता मालेगाववरुन सोग्रसला चार चाकी काळीपिवळी गाडीने जात होता. त्यावेळी त्याच्या गाडीतील एका व्यक्तीला आडगाव टप्पा या ठिकाणी उतरायचे होते. त्यामुळे सदर साक्षीदार गाडीतून खाली उतरला व उतरत असतांना त्याचे लक्ष दुसरीकडे गेले. त्यावेळी समोरुन लाल रंगाची मारुती सुझूकी ब्रिजा कार क्र. एम.एच.४१, ए.एस.४१४२ ही भरधाव वेगाने आली व त्यावेळी एक दुसरा व्यक्ती भाऊराव जाधव या डोक्याला, पायाला व कमरेला मार लागला. त्यावेळी ब्रिजा कारचा चालक हा थोडे पुढे गेला व दोन मिनीट थांबून तो निघून गेला. त्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे जखमी भाऊराव जाधव यास उप–जिल्हा रुग्णालय चांदवड येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यास मालेगाव येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यास धुळे येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी तो मयत झाला. घटनेसंदर्भात पोलिसांनी सदर साक्षीदाराचा जबाब घेतला होता.

१३. उलटतपासात त्याने कथन केले आहे की, घटनेच्या दिवशी तो मालेगाववरुन सोग्रसला जात होता, तो त्यादिवशी संध्याकाळी ५:३० वाजता मालेगाववरुन काळीपिवळी गाडीत बसला होता. मयत भाऊराज जाधव सदर साक्षीदाराच्या परिचयाचे होते. सदर साक्षीदार ज्या काळीपिवळी गाडीत बसला होता त्यात त्याला सोडून इतर आठ प्रवासी होते. आडगाव टप्पयाजवळ गतिरोधक असून चौफुली देखील आहे व त्यामुळे ठिकठिकाणी येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांचा वेग कमी होतो. घटनेनंतर तो चांदवडला मित्राकडे आला, दुसरीकडे कोठेही गेला नाही. ब्रिजा कार चालकाचे नाव सदर साक्षीदाराला पोलिसांकडून कळाले. पोलिसांनी त्याचा

जबाब कोठे नोंदवला व कोणी नोंदवला हे त्याला आठवत नाही. तथाकथित घटना झाल्यानंतर ब्रिजा कार चालक हा गाडी घेऊन तेथून पळून गेला असे कथन केले आहे.

**१४.** अभियोग पक्षाने साक्षीदार बापू हिरामण चव्हाण (अ.सा.क्र.४) याला **निशाणी क्र.२९** वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दि.०५.०२.२०१९ रोजी ते पोलीस स्टेशन चांदवड येथे पोलिस हवालदार म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी तोंडी आदेशावरुन त्यांना गुन्हा क्र. १७/२०१९ कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ कलम १८४ मोटर वाहन कायदा नुसार तपास त्यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यांनी त्यानंतर कागदपत्रांचे अवलोकन केले व त्यांनी दि.०६.०२.२०१९ रोजी घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमोर पंचनामा केला होता. त्यावर सदर साक्षीदाराची व दोन पंचांची सही आहे. साक्षीदार जबशेर शब्बीर पठाण याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतला होता. अपघात करणारी ब्रिजा गाडी क्र. एम.एच.४१, ए.एस. ४१४२ ही सटाणा तालुक्यातील लखमापूर गावातील असल्याचे समजल्यावरुन त्याठिकाणी जाऊन शोध घेतला. मात्र गाडी व गाडी चालक मिळून आला नाही. त्याठिकाणी पोलिस स्टेशनला हजर होण्याबाबत निरोप ठेवून आले होते. त्यानंतर दि.११.०२.२०१९ रोजी अपघात करणारा आरोपी गाडीसह पोलीस स्टेशनला हजर झाल्यावरुन त्याला गुन्ह्याची थोडक्यात हकीकत सांगितली व मो. वाहन कायद्याप्रमाणे नोटीसा दिल्या. त्यावर सदर साक्षीदार यांची व आरोपीच सही आहे. ती निशाणी ३० वर आहे. त्यांनी आरोपीला अटक केली होती. त्यांना आरोपीविरुद्ध पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने उप-प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना तांत्रिक तपासणीकरीता पत्र दिले होते व त्यानंतर तपासणी अहवाल प्राप्त झाला होता व तो

त्यांनी दोषारोपपत्रासोबत समाविष्ट केला आहे असे कथन केले आहे.

**१५.** साक्षीदार क्र. ४ याने त्यांच्या उलटतपासात कथन केले आहे की, आडगाव टप्पा या ठिकाणी चौफुली आहे व त्या ठिकाणी आडगाव गावाकडे व बरवीर गावाकडे जाणारा रस्ता आहे व त्या ठिकाणी वेग प्रतिबंधक लावलेले आहे. अपघातग्रस्त वाहन ब्रिजा त्यांना घटनास्थळी मिळून आले नव्हते. तपासात त्यांना प्रत्यक्षदर्शी कोणताही साक्षीदार मिळून आला नाही. आडगाव टप्प्यावर महाराणा हॉटेल व लहान मोठी दुकाने आहेत ही बाब मान्य केली आहे. ब्रिजा गाडी घटनेच्या दिवशी कोण चालवत होता हे बघणारा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार त्यांना मिळून आला नव्हता असे कथन केले आहे.

**१६.** अभियोग पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केलेला आहे ही बाब निसंशयीतपणे शाबीत झालेली आहे. सदरील साक्षीदारांच्या साक्षेवर गैरविश्वास ठेवावा अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही, त्यामुळे आरोपीला कायद्याप्रमाणे शिक्षा करण्यात यावी. त्याउलट आरोपीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सदर प्रकरणात इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदवली नाही. घटनेला कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. मयत हा घटनेवेळी विना परवाना व विना हेलमेट होता. आरोपी घटनेच्यावेळी सदर वाहन चालवित असल्याबाबत कोणताही पुरावा नाही व अपघात आरोपीचे वाहन तो हलगर्जी व निष्काळजीपणाने चालवित असल्याने झाला होता असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या प्रकरणावर संशय निर्माण होतो. त्याकारणाने आरोपीला प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

१७. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४–अ, व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ लावण्यात आलेले आहे. आरोपीने सार्वजनिक ठिकाणी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल व इतरांची परिस्थीती धोक्यात येईल अशा पध्दतीने चालवुन समोरुन रोड क्रॉस करणारे भाऊराव आनंदा जाधव यांना जोराची धडक देवुन अपघात घडुन आणला व त्यात भाउराव आनंदा जाधव यांना किरकोळ व गंभीर दुखापत करुन यांच्या मृत्युस कारणीभुत ठरला व सदोष मनुष्यवध या सदरात न मोडणाऱ्या गुन्हयास करण्यास पात्र ठरला ही बाब सिध्द होणे आवश्यक आहे. थोडक्यात, खरोखरच आरोपी सार्वजनिक ठिकाणी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवले व अपघात घडुन आणला व त्यात भाउराव आनंदा जाधव यांना किरकोळ व गंभीर दुखापत करुन यांचा मृत्यु झाला ही बाब तपासणे आवश्यक आहे.

१८. अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही व कोणत्याच साक्षीदाराने गुन्हा घडतांना पाहिले नाही व तसा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा साक्षीपुरावा अभिलेखावर आला नाही. तपासलेला साक्षीदार क्र. ३ याने तो काळ्या पिवळी गाडीने गावाकडे जात असतांना चौफुलीवर काळी पिवळी गाडी थांबली त्यावेळी त्याने तो अपघात त्याच वेळी पाहिला असे कथन केले आहे. त्याने तो संध्याकाळी ०५.३० वाजता मालेगाव वरुन सोग्रसकडे जात होता असे कथन केले आहे. तसेच त्याने सदर अपघात ०७.०० वाजता घडला व तो त्याने पाहिला असे कथन केले आहे. तपासलेला साक्षीदार हा घटनास्थळापासून लांब अंतरावर होता व त्यावेळी संध्याकाळचे ०७.०० वाजले होते त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष घटना व आरोपीला पाहिले

होती किंवा कसे यामध्ये संशय निर्माण होतो. अभियोग पक्षाने तपासलेले तपासी अधिकारी यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपी गाडी चालवित होता याबाबत त्यांना कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आला नव्हता असे कथन केले आहे व ही बाब त्यांना तपासात निष्पन्न झाली होती असे कथन केले आहे. त्यामुळे, एकंदरीत अभिलेखावर आलेल्या साक्षीपुराव्यांवरुन आरोपीच्या चुकीने व हलगर्जीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवले व अपघात घडुन आणला व त्यात भाउराव जाधव यांचा मृत्युस तो कारणीभुत ठरला ही महत्वाची बाब अभियोगपक्ष वांजवी संशया पलीकडे सिध्द करु शकला नाही.

**१९.** अभियोगपक्षाला पुरेसी संधी देवुन देखील आरोपीच्याच वाहनाने अपघात झाला ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही. आरोपीला सदरील गाडी चालविताना पाहिले असल्याबाबतचा व तो त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित होता व त्याने सदरचा अपघात घडवून आणला व त्यात भाउराव आनंदा जाधव यांचा मृत्युस कारणीभुत ठरला ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही. एकदंरीत अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेल्या साक्षीपुराव्यावरुन आरोपी त्यावेळी ब्रिजा गाडी क्र. एम.एच.४१, ए.एस. ४१४२ ही गाडी चालवित होता व त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात घडवुन आणला ही बाब वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही. अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला नाही की आरोपी सार्वजनिक ठिकाणी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने त्याच्या ताब्यातील वाहन चालवले व अपघात घडुन आणला. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला कोणताही गुन्हा अभियोग पक्ष संशयापलीकडे सिध्द करु न शकल्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देवुन मी विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी

देत आहे.

**विचाराधिन प्रश्न क्र.५ बाबतः–**

**२०.** विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ४ च्या नकारार्थी उत्तराच्या अनुषंगाने मी विचाराधिन प्रश्न क्र.५ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **दिपक अरुण शेवाळे** याची भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३०४–अ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/ब, १७७ अन्वये अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २५५(१) च्या तरतुदी नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे व त्याला मोकळे सोडण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी रक्कम रुपये १०,०००/– चे बंधपत्र व जामीन द्यावा व त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार आजपासुन सहा महिन्यानंतर रद्द समजण्यात यावे. |
| ४. | खटल्यात जप्त मुद्देमाल ब्रिजा गाडी क्र. एम.एच.४१, ए.एस. ४१४२ मुळ मालकास परत करण्याव यावी व त्या करीता घेतलेले बंधपत्र अपीलाचा कालावधी पर्यंत कायम करण्यात यावे. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.03.10 17:55:21 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.०१), चांदवड.

दिनांक :–१०/०३/२०२६

<u>CNR No.MHNS160000232020</u> <u>सं.फौ.ख.क्र.१४/२०२० (न्यायनिणर्य)</u>
<u>सरकार विरुद्ध दिपक शेवाळे.</u>

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे***<br>लघुलेखक (ग्रेड–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग<br>(न्या.क्र.०१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | १०/०३/२०२६ |

न्या.दं.प्र.श्रे.